(2)

परिपत्रक

क्र मबाविआ/अमाकृ/कारवाई/२००९-१०/८८०९
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
दिनांक २७-१०-२००९.
३१

विषय : धार्मिक ठिकाणी अथवा इतर ठिकाणी मुलांवर होणारे अमानवी कृत्य घडु नये यासाठी योग्य ती उपाययोजना करणे बाबत.

हजरत खाँजा जैनेदिन चिस्ती समर खंदी दर्गा रहे उर्फ जिंदावली दर्गा, मार्डी ता लोहारा जिल्हा उस्मानाबाद आणि मौजे हरंगुळ ता गंगाखेड जिल्हा परभणी या ठिकाणी दर्ग्याच्या छतावरुन मुलांना खाली फेकले जाते या अनुषंगाने अशा प्रकारच्या अमानवी घटना यापुढे घडू नयेत यासाठी आपणास खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

- महिला व बाल विकास अंतर्गत हुंडाबंदी प्रतिबंधक कायद्याचे अंतर्गत महिला मेळावे घेतले जातात या कार्यक्रमासाठी मा. जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन विभाग, जिल्हा माहिती अधिकारी इत्यादी विभागांचे सहकार्य घेऊन बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व नियम २००२ ची माहिती बाबत समाज प्रबोधन करावे.
- बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व नियम २००२ अंतर्गत प्रकरण तीन मधील कलम २४, २५ नुसार अमानवी कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर अध्यक्ष / सदस्य बाल कल्याग समिती यांच्या मार्फत कारवाई करण्यास सक्षम आहेत त्यामुळे अशा घटना घडत असताना त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हयातील बाल कल्याण समितीचे सहकार्य जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी घ्यावे.
- आपल्या जिल्हयात अमानवी कृत्य घडल्यास बाल कल्याण समिती किंवा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी भारतीय दंड संहिते अंतर्गत पोलीस विभागाने कारवाई करणे बाबत मदत घ्यावी. अशा अमानवी घटना घडणार नाहीत यासाठी महिला मेळावे, बाल मेळावे, जिल्हा निहाय समिती बैठका, तसेच शासकीय व स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधींना यात सामावून घेवून समाज प्रबोधनाचे काम करावे.

स्थळ प्रतिवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकरिता

प्रति,

१. कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. अध्यक्ष, बाल कल्याण समिती (सर्व)
३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, (सर्व)

(३)

परिपत्रक

क्र. मबाविआ/ बावि / बाकस /का ५/०९-१०/२३५६
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
दिनांक- ३०.३.२०१०.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियमातील तरतुदीनुसारच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकाबाबतचा कौटुंबीक अहवाल प्राप्त करुन काळजी व संरक्षणाची खरी गरज असल्याची खात्री करुनच अशा बालकांबाबतचे दाखल आदेश निर्गमित करावेत. कोणत्याही परिस्थितीत कौटुंबीक अहवाल आल्याशिवाय आदेश देण्यात येवू नयेत अशा सुचना यापुर्वीच आपणास देण्यात आल्या होत्या.

तसेच यापुर्वी बाल कल्याण समितीने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न करता संस्थेत बालकेदाखल केलेली असल्याने याबालकांच्या बाबतीत समितीने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत सुचित करण्यात आले होते याकरीता समितीने संस्थेतील बालकांचा गृहचौकशी अहवाल प्राप्त करुन घेवून प्राप्त चौकशी अहवालावर समितीच्या बैठकीत विचार करुन योग्य बालकांना केवळ अंतिम पर्याय म्हणूनच संस्थेत ठेवण्यात यावे अशा सुचना देण्यात आल्या परंतु माझ्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, काही बाल कल्याण समितींनी दिलेल्या आदेशाचे अवलोकन करता प्रत्येक बालकाच्या बाबतीत स्वतंत्रपणे निर्णय न घेता सोन पालक असलेल्या बालकांचे आदेश एकत्रित पणे रद्द करण्याबाबत आदेश निर्गमित केले आहे.

प्रत्यक्षात बाल कल्याण समितीसमोर आलेले मुल हे काळजी व संरक्षणाची गरज असलेले आहे किंवा नाही या बाबत संबधित परिविक्षा अधिकारी यांनी दिलेले अभिप्राय, बालकांचा कौटुंबिक अहवाल, अधिनियमातील तरतुदी, बालकांच्यासाठी असलेल्या इतर संस्था बाह्य सेवा या सर्वांचा प्राधान्याने विचार करुन अंतिम पर्याय म्हणून त्यांना संस्थेत दाखल करणे अपेक्षित आहे. समितींनी अशा प्रकारे कार्यवाही न केल्याने समितीला संस्थेतील बालकांचा आढावा घेवून ३०, एप्रिल पर्यंत निर्णय घेण्याच्या सुचना दिल्या होत्या परंतु अशी कार्यवाही न करता सरसकटपणे दाखल आदेश रद्द करणे किंवा आढावा न घेताच ३० एप्रिल ला आदेश रद्द करण्यात येत असल्याचे आदेशित करणे ही बाब बालकाच्या हिताची ठरत नाही. प्रत्येक बालकाच्या बाबतीत वरील पध्दतीचा अवलंब करुन स्वतंत्रपणे आदेश निर्गमीत करणे आवश्यक आहे.

या परिपत्रकाव्दारे आपणास पुनश्च एकदा सुचित करण्यात येते की शासन निर्णय दिनांक २५.३.२०१० नुसार बाल कल्याण समितीने मार्च २००९ पुर्वी संस्थेत दाखल केलेल्या बालकाचे आदेशाचा आढावा घेवून काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना अंतिम पर्याय म्हणून संस्थेत दाखल करण्याचे आदेश निर्गमीत करावेत व उर्वरीत बालकांना काळजी व संरक्षण करणाऱ्या पालकांकडे सुपुर्त करण्यात यावे किंवा इतर संस्था बाह्य सेवांचा लाभ देण्यात यावा. असे करताना प्राप्त अहवालाचा संयुक्तपणे बैठकीत विचार करुन मताधिक्याने बालकाच्याबाबतीत निर्णय घेवून आदेश पारित करावेत. कोणत्याही परिस्थितीत एकत्रित पणे आदेश पारित करण्यात येवू नये.

वरिल सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३०/३/१०

( बाजीराव जाधव )
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. अध्यक्ष, बाल कल्याण समिती (सर्व)
२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)

**परिपत्रक**

जा.क्र.मबाविआ/बासक/अह प्रा/०९-१० / ३२०५
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १
दिनांक ०३/०५/२०१०

बाल कल्याण समितीच्या बैठकांच्या नोंदी नियमित ठेवणे आवश्यक आहे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम २९ अन्वये बाल कल्याण समिती गठीत करण्यात येते. राज्यातील ३५ जिल्हांसाठी बाल कल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील तरतुदीनुसार नियम ७ (१) नुसार बाल कल्याण समितीची बैठक बालगृहाच्या जागेमध्येच बोलावण्यात येईल.अशा बैठका विविध बालगृहात घेता येतील. त्यासाठी बैठकीचे ठिकाण ठरविण्याकरिता एक वेळापत्रक तयार करुन प्रत्येक बालगृहाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. या बैठकीची गणपूर्ती अध्यक्ष धरुन तीन उपस्थित सभासद इतकी असेल

नियम ७ (३) समिती आठवडयातून निदान तीन दिवस बैठका घेईल तसेच महत्वाचे कामकाज करावयाचे असल्यास अध्यक्ष बैठकीची वेळ वाढवतील

नियम ८(७) समितीची बैठक नसेल अशा वेळी वैयक्तीक सदस्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला समितीच्या नंतरच्या बैठकीत समितीने अनुमोदन देणे आवश्यक आहे.

बाल कल्याण समिती सदस्यांना बैठक भत्ता, वाहन भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अदा करणेबाबत क्र. जेजेए- २००४ /प्र.क्र.९७ /का-३ /दिनांक १३ जुलै २००४ या शासन निर्णयानुसार कार्यरत सर्व बाल कल्याण समितीला महिला व बाल विकास विभागा मार्फत भत्ते अदा केले जातात सबब बाल कल्याण समितीच्या बैठकांच्या नोंदी नियमित, व्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे.

आयुक्त कार्यालयाच्या असे निर्देशनास आले आहे की बाल कल्याण समितीच्या बैठकीमधील कामकाजाच्या नोंदी व्यवस्थित, नियमित ठेवलेल्या नाहीत, बाल कल्याण समितीच्या सदस्यांच्या सहया घेतलेल्या नाहीत

या परिपत्रकाव्दारे आपणास सुचित करण्यात येते की आपल्या जिल्हातील सर्व संस्था प्रमुख, अधिक्षक /अधिक्षिका यांना आपल्या स्तरावरुन परिपत्रकाव्दारे सुचना देण्यात याव्यात तसेच सनियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी.

**स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य,पुणे १. यांचेकरिता**

**प्रत,**

१) अध्यक्ष, बाल कल्याण समिती (सर्व)
२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)

(९)

**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र.मबाविआ/बावि/का-५/२०१०-११/ ४५०७
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
दिनांक:- १४ /०७/२०१०.

प्रति,
अध्यक्ष,
बाल कल्याण समिती [सर्व]

---

**विषय**:- बाल न्याय [मुलांची कळजी व संरक्षण] अधिनियम २००० व सुधारीत अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र बाल न्याय [मुलांची कळजी व संरक्षण] नियम २००२ मधील तरतूदीनुसार कामकाज करणे बाबत.

बाल न्याय [मुलांची कळजी व संरक्षण] अधिनियम २००० व सुधारीत अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र बाल न्याय [मुलांची कळजी व संरक्षण] नियम २००२ मधील तरतूदीनुसार कामकाज पाहण्याकरिता मार्गदर्शन म्हणून आपणास यापुर्वी वेळोवेळी आयुक्तालयाने परिपत्रकाव्दारे सविस्तर सुचना दिल्या होत्या. अधिनियम आणि नियम यानुसार कामकाज चांगल्या प्रकारे व्हावे या हेतूने परिपत्रकाव्दारे सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतू या परिपत्रकांचा विपर्यास होऊन आणि चुकीचा अर्थ लावला जाऊन त्या आधारे बालगृहे चालकांना त्रास दिला जातो. तसेच बालकांच्या प्रवेशाच्या वेळी वेळेत कार्यवाही केली जात नाही असे संस्था चालकांच्या संघटनेच्या निवेदनावरुन आणि दिनांक १४/७/२०१० रोजी संस्था चालकांशी व संघटनेशी झालेल्या चर्चेवरुन निदर्शनास आले आहे.

तेंव्हा सर्व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांना सुचना देण्यात येते की, त्यांनी केवळ आयुक्तालयाने मार्गदर्शनपर देण्यात आलेल्या परिपत्रकातील सुचनांचा चुकीचा अर्थ काढून बालकांना आश्रय मिळणेपासून वंचित ठेवू नये आणि संस्था चालकांनाही त्रासदायक होईल अशा अनावश्यक कार्यपध्दतीचा अवलंब न करता बाल न्याय [ मुलांची काळजी व संरक्षण] अधिनियम २००० व सुधारीत २००६ आणि महाराष्ट्र बाल न्याय [मुलांची काळजी व संरक्षण] नियम २००२ मधील तरतूदीं नुसार कामकाज पहावे.चूकीच्या पध्दतीने अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करुन संस्था चालकांना त्रास दिल्यास व बालकांना आश्रयापासून वंचित ठेवल्यास आपल्या विरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१५-७-१०

आयुक्त
**महिला व बाल विकास,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

प्रत:-

१] मा.सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२] जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी [सर्व जिल्हे] यांना कार्यवाहीस्तव.
३] अध्यक्ष, बाल विकास संस्थाचालक व कर्मचारी संघटना [महाराष्ट्र राज्य],तुळजाभवानी नगर,नवीन रेल्वेस्टेशन रोड,लातूर-४१३५३१ यांना माहिती करिता रवाना.

[illegible]

(६)

परिपत्रक

जा.क्र.मबाविआ/बावि/११-१२/का-५/८०२
महिला व बाल विकास आयुक्तालय
२८, राणीचा बाग,जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य, पुणे १
दिनांक २३.१.२०१२

बाल कल्याण समितीच्या बैठकांच्या नोंदी नियमित ठेवणे आवश्यक आहे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम २९ अन्वये बाल कल्याणसमिती गठित करण्यात येते. राज्यातील ३५ जिल्हांसाठी बाल कल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील तरतुदीनुसार नियम ७ (१) नुसार बाल कल्याण समितीची बैठक बालगृहाच्या जागेमधे बोलावण्यात येईल अथवा अशा बैठका विविध बालगृहात घेता येतील या केलेल्या कामकाजाचा त्रैमासिक अहवाल व संस्था भेटीचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील प्रकरण ३ मधील कलम ८ (२९) च्या तरतुदीनुसार बाल कल्याण समिती कडून त्रैमासिक अहवाल आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक आहे. जनहित याचिका १८२ /२०१० मधे मा.उच्च न्यायलय, मुंबई यांनी त्रैमासिक अहवाल व संस्था भेटीचे अहवाल आयुक्तालयास पाठविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

आयुक्त कार्यालयाच्या असे निर्देशनास आले आहे की बाल कल्याण समितीचे त्रैमासिक अहवाल आयुक्तालयास प्राप्त होत नाहीत त्यामुळे शासनास अहवाल सादर करणे आयुक्तालयास सादर करणे शक्य होत नाही.

तरी या परिपत्रकाव्दारे आपणास सुचित करण्यात येते की आपल्या जिल्हयातील बाल कल्याण समितीला हे परिपत्रक अवगत करुन द्यावे. व सनियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे १.यांचेकरिता**

प्रती,
१) अध्यक्ष / सदस्य बाल कल्याण समिती (सर्व)
२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, (सर्व)

(6)

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस शेजारी
महाराष्ट्र राज्य, पुणे १
दिनांक ०४.०३.२०१३

प्रती,
मा.अध्यक्ष / सदस्य
बाल कल्याण समिती , (सर्व )
जि. पुणे

विषयः- बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियमांतर्गत कार्यरत संस्था प्रवेशाबाबत व नवीन प्रवेशितांना बालगृहात प्रवेश देताना शासकीय संस्थांना प्राधान्य देण्याबाबत

संदर्भ :- १. शासन परिपत्रक २०१० / प्र.क्र.१०६ / का-३ / दिनांक २५.०३.२०१०
२. शासन परिपत्रक २०१० / प्र.क्र.४५ / का-३ / दिनांक १५.१०.२०१०
३. शासन अ.शा.पत्र क्र.संकीर्ण २०१२ / प्र.क्र.२९१ / का-३ / दिनांक ०७.०२.२०१३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.१,२ च्या शासन परिपत्रकाचे अवलोकन व्हावे, या परिपत्रकात नमुद बाबी बाबत काही कार्यवाही झालेली नसल्याने मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग , मंत्रालय, मुंबई यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे, यास्तव शासनाने संदर्भ क्र. ३ च्या अर्ध शासकीय पत्राव्दारे पुनश्च खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

१. नवीन प्रवेशितांना बालगृहात प्रवेश देताना शासकीय संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे, याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये यापुर्वीही आपणास सुचित करण्यात आले होते, परंतु याबाबत आपल्या कडून अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येते, तरी या आदेशाचे काटेकोर पणे पालन करुन बालकांना प्रथम शासकीय बालगृहात प्रवेश द्यावा, व शासकीय बालगृहात जर जागा रिक्त नसतील तरच बालकांच्या प्रवेशाबात स्वयंसेवी संस्थांचा विचार करावा.

२. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण )अधिनियम, २००० च्या बाल न्याय अधिनियमाच्या कलम ३३ (१) नुसार कलम ३२ अन्वये अहवाल मिळाल्यावर, समिती किंवा कोणताही पोलीस अधिकारी किंवा विशेष बाल पोलीस दल किंवा पदनिर्देशित पोलीस अधिकारी विहित रीतीने चौकशी करील आणि समिती, स्वत:हून किंवा कलम-३२ च्या पोटकलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीकडून किंवा अभिकरणाकडून मिळालेल्या अहवालावर सामाजिक कार्यकर्ता किंवा बाल कल्याण अधिकाऱ्यांकडून मुलाची सत्वर चौकशी करण्यासाठी बालगृहात पाठविण्याचा (२) या कालावधीत चौकशी आदेश मिळाल्यापासून चार महिन्यांच्या आत किंवा समितीने ठरवून दिला असेल अशा कमीत कमी कालावधीत पूर्ण करण्यात येईल. परंतु , चौकशी अहवाल सादर करण्याचा कालावधी, परिस्थिती विचारात घेऊन आणि अभिलिखित कारणांसाठी समिती ठरवील इतक्या कालावधीपर्यन्त वाढवता येईल. (३) चौकशी पुर्ण झाल्यानंतर उक्त मुलाला कुटुंब किंवा वरकरणी आधार नाही असे समितीचे मत असेल तर, त्यांच्याकरिता योग्य पुनर्वसन मिळेपर्यन्त किंवा तो अठरा

३. तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण )अधिनियम, २००० च्या कलम ३९ (१) नुसार कोणत्याही बालबृहाच्या किंवा निवारा गृहाचा मूळ उद्देश मुलांचे पुन:स्थापन करणे आणि त्यांना संरक्षण देणे, हे असेल. (२) बालगृहे किंवा यथास्थिती, निवारागृहे, कौटुंबिक वातावरणापासून तात्पुरते किंवा कायमस्वरुपी वंचित असणा-या एखाद्या मुलास जर असे मुल बालगृहात किंवा यथास्थिती निवारागृहात, काळजी व संरक्षण यासाठी ठेवण्यात आले असेल तर, त्याच्या पुन: स्थापनेसाठी व संरक्षणासाठी, आवश्यक वाटतील अशी पावले उचलतील (३) समितीला काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या कोणत्याही मुलास, त्यांचे माता पिता पालक, योग्य व्यक्ती किंवा यथास्थिती योग्य संस्था, यांच्याकडे परत देण्याचा आणि त्यांना योग्य निदेश देण्याचा अधिकार असेल . मुलांचे पुन:स्थापन याचा अर्थ (क) माता-पिता (ख) दत्तक घेणारे माता-पिता (ग) बाल संगोपन करणारे मात-पिता यांच्याकडे मुलाला परत देणे असा आहे. काळजी व संरक्षणाची आवश्यकता असणा-या बालकांच्या बाबत या तरतुदीनुसार प्रथम निर्णय घ्यावा व शेवटचा पर्याय म्हणून संस्थेत दाखल करावे.

४. बालकास किती कालावधीसाठी संस्थेत काळजी व संरक्षणाच्या कारणास्तव ठेवावे याचाही निर्णय प्रकरणानिहाय बारकाईने छाननी करुन समितीने घेणे आवश्यक आहे.यानुसार किती प्रकरणाबाबत १ एप्रिल २०१२ पासून कार्यवाही केली याची महिना निहाय सांख्यीक माहिती सादर करावी .

५. बालकाला पालक असल्यास बाल कल्याण समितीने त्याबाबतचा गृहचौकशी अहवाल प्राप्त करुन घेवून बालकाच्या हिताचा विचार करुन संस्थेत ठेवण्याबाबतचा पुढील निर्णय घेतलेला आहे अशा १ एप्रिल २०१२ पासून च्या प्रकरणाबाबतची महिना निहाय कारणांसहित माहिती सादर करावी.

६. उपरोक्त नमूद मुद्दा क्र.४ व ५ या बाबींबाबत दिनांक १५.३.२०१३ पुर्वी कार्यवाही करुन खालील नमुन्यात अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यांच्या कार्यालयामार्फत आयुक्तालयास सादर करावा.

| अ.क्र. | महिना | हाताळलेली प्रकरणे | | निकाली काढलेली प्रकरणे | | प्रलंबित पकरणे | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ |
| | | पालक असलेले लाभार्थी संख्या | अनाथ असलेले लाभार्थी संख्या | पालक असलेले लाभार्थी संख्या | अनाथ असलेले लाभार्थी संख्या | पालक असलेले लाभार्थी संख्या | अनाथ असलेले लाभार्थी संख्या | |
| १ | एप्रिल २०१२ | | | | | | | |

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे १. यांचेकरिता

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, (सर्व) यांना कळविण्यात येते की उपरोक्त बार्बीबाबत अध्यक्ष / सदस्य बाल कल्याण समिती यांच्याकडून संस्थानिहाय लाभार्थीच्या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त करुन घेण्यात यावेत.

ज्या बाल कल्याण समितीच्या कामकाजाबाबत तक्रारी असतील अशा बाल कल्याण समिती बाबतचे अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दिनांक २०.३.२०१२ पुर्वी आयुक्तालयास सादर करावेत. तसेच आपल्या कार्यालयाकडूनही वेळेत आढावा अहवाल प्राप्त न झाल्यास आपल्या विरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात यावी, व आपल्या कामकाजाबाबत वार्षिक गोपनीय अहवालात नोंद घेण्यात यावी असेही शासनाने संदर्भिय पत्रान्वये आयुक्तालयास आदेशित केलेले आहे तरी सदरहू बाबींची आपण गांभीर्यपूर्वक नोंद घेवून वेळेपुर्वी अहवाल आयुक्तालयास पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी.

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे १. यांचेकरिता

(८)

परिपत्रक

क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१५-१६/५६४६
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
**Email-dy.commissionercd@yahoo.com**
दिनांक- २३.१०.२०१५

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम २९ अन्वये बाल कल्याण समिती गठीत करण्यात येते राज्यातील ३५ जिल्हांसाठी बाल कल्याण समिती गठित करण्यात आलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, (८) नियम २०११ मधे नमूद तरतुदी नुसार देखभाल व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांवर संबंधातील प्रकरणाचा अंतिम निकाल तीन सभासदाच्या आदेशाव्दारे समितीच्या कार्यालयातून करण्यात येईल.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, (२३) मधे नमूद नुसार समिती गृहामधील बालकाच्या प्रगतीचा आढावा घेईल.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०११ मधे मुख्य नियमांच्या नियम ७ नंतर, पुढील नियम जादा दाखल करण्यात आलेले आहेत यानुसार ९ ७ (ख) १० मधे नमूद नुसार अधिनियमाच्या कलम ३३ (३) अन्वये बंधनकारक असल्याप्रमाणे प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी, आयुक्त व राज्य सल्लागार मंडळ यांच्या मार्फत, राज्य शासनाला, त्यांच्या समोरील बाल प्रकरणांच्या बाबतीतील सहामाही माहिती पाठविणे,

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०११ मधील प्रकरण तीन एक ८ (ख) बाल कल्याण समितीचा अभिलेख - प्रत्येक समितीकडे या नियमांन्वये अथवा आदेशांन्वये विहित करण्यात आलेल्या नोंदवहयांबरोबरच, विहित नमुन्यातील पुढील नोंदवहया ठेवण्यात येतील

(एक) नमुना सतरा - छ मधील प्रकरण नोंदवही.

(दोन) नमुना सतरा - ज मधील संकीर्ण अर्ज नोंदवही.

(तीन) नमुना सतरा - झ मधील वचनपत्र नोंदवही.

(चार) बालकाला किंवा त्याच्या माता-पित्यांना नमुना सतरा - त्र मध्ये पुरविलेल्या, अंतिम निर्णयाच्या प्रतीची नोंदवही.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, नियम २०११ मधे वर नमूद तरतूदी आहेत परंतु या तरतुदी नुसार बाल कल्याण समितीचे कामकाज होत नसल्याचे मा.महालेखापाल, महालेखाकार कार्यालय, मुंबई

यांनी राज्यातील ८ जिल्हयातील संस्थाच्या तपासणी केली त्यावेळी उपरोक्त नमूद तरतूदीनुसार बाल कल्याण समितीचे कामकाज होत नसल्याचे त्यांचा निदर्शनास आले, सदर बाब त्यांनी आयुक्तालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. तसेच सदरच्या बाबी लेखापरीक्षण अहवालात ही नमूद केलेल्या आहेत,

या अनुषंगाने सदर परिपत्रकाव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या जिल्हयातील सर्व संस्था प्रमुख, अधिक्षक / अधिक्षिका यांना आपल्या स्तरावरुन परिपत्रकात नमूद तरतूदी नुसार कार्यवाही करणेबाबत सुचना देण्यात याव्यात व तसेच सनियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून तरतूदीनुसार कामकाज होते कि नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

**उप आयुक्त (बा.वि.)**
**महिला व बाल विकास,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.यांचेकरिता**

O/C
१५३
२३.१०.२०१५

प्रत, माहिती तथा कार्यवाहीस्तव

१. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व) आपणास कळविण्यात येते की, वर नमूद तरतूदीनुसार कार्यवाही करावी

२. अध्यक्ष / सदस्य बाल कल्याण समिती (सर्व)

३. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी (सर्व)